## रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. १३९/२०१५ मधील
## निशाणी ७७ वरील आदेश

(श्रीमती द्रोपदी हिरगुडे वि. बाबासो हिरगुडे वगैरे)

०१. प्रतिवादी नं. १/१ ते १/४ यांनी सदरचा अर्ज त्यांना सदर प्रकरणात वादी म्हणून वर्ग करणेस व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी नं. १/१ ते १/४ असे कथन केले आहे की, सदर प्रकरणातील वादी ही वयस्कर व सतत आजारी असल्याने तिला प्रत्येक तारखेस हजर राहून प्रत्यक्ष दावेचे कामकाज चालविणे अशक्य आहे. सदरचा दावा हा वाटपाचा असल्याने या प्रकरणातील प्रतिवादी यांनीही त्यांचा हिस्सा तुटक होऊन मिळणेची मागणी केली आहे. त्यामुळे त्यांचाही सारखाच सहभाग आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील प्रतिवादी यांना वादी म्हणून सामील करुन घ्यावे व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. वादीतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, प्रतिवादीच्या सदर अर्जाप्रमाणे दुरुस्ती करणेस वादी यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

०४. प्रतिवादींचा अर्ज, त्यावरील वादीचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द तुटक वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे सदर अर्जावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी नं. १/१ ते १/४ यांनी मागितलेली दुरुस्ती ही आवश्यक स्वरुपाची आहे व त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात व दावा विषयात बदल होणार नाही. त्याचप्रमाणे वादी यांनी अर्जामध्ये दुरुस्ती करणेस त्यांची हरकत नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दुरुस्ती मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. तसेच

यामुळे दाव्यांची संख्या मर्यादित राहून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे मुद्दे एकत्रात निकाली करणे सोपे होईल. प्रतिवादीस सदरची दुरुस्ती करणेस देणे योग्य होणार आहे. सबब वरील विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी नं. १/१ ते १/४ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी नं. १/१ ते १/४ यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये विहीत कालावधीत नियोजीत दुरुस्ती करावी.

३. प्रतिवादी नं. १/१ ते १/४ यांनी दुरुस्त वादपत्राची प्रत न्यायालयासाठी व वादीसाठी दयावी.

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2022.09.19 17:12:04 +0530

दिनांक : १९.०९.२०२२.

(श्रीमती आर.व्ही. कांबळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दुसरे कोर्ट, मिरज

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. Sandip Shankar Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 19 | 09 | 2022 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 19 | 09 | 2022 |
| Judgment/order uploaded on | :- | 19 | 09 | 2022 |